दिनांक ४/४/२०२३ रोजी एस.एन.डी.टी कॉलेज च्या रोटरी हॉल मध्ये स्नेहसेवेच्या वर्ष २०२३-२०२४ च्या नवीन अध्यक्षा श्रीमती. नीलिमा भडभडे यांचा पदग्रहण समारंभ पार पडला.

समारंभाचे सुत्र संचलन श्रीयुत. शामराव भुरके यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीयुत. विश्वकुमार बडवे यांनी प्रमुख पाहुण्या श्रीमती वैजयंती जोशी, माजी प्रिसिपल, लॉ कॉलेज, पुणे, यांचा सत्कार केला. त्या नंतर दिप प्रज्वलनाचा कार्यक्रम झाला. मावळते अध्यक्ष श्री. सुधीर पळसुले आणि उपाध्यक्ष श्री. अविनाश जोशी यांनी गत वर्षातील कार्यक्रमांचा आढावा घेतला. त्या मध्ये ‘स्नेह-सैनिक’ ह्या कार्यक्रमांतर्गत सैनिकांना सरहद्दीवर मिठाई पाठवली याचा आवर्जून उल्लेख केला.

त्या नंतर रुग्णसेवेबद्दल श्री. विनोद दप्तरदार, डॉ. श्री. निरंतर व डॉ. श्री. हरीश महाजन यांना ट्रॉफी प्रदान करण्यात आली. तसेच श्री. सुधीर पळसुले यांनी अध्यक्ष पदाची सुत्रे श्रीमती. सुनिता वाघ यांना प्रदान केलीत. ह्याप्रमाणे, अधिकार हस्तांतरणाचा कार्यक्रम झाला व नवीन कार्यकारिणीचे सदस्य जाहीर करण्यात आले.

श्रीमती. वैजयंती जोशी, श्री. विश्वकुमार बडवे व अध्यक्षा श्रीमती. नीलिमा भडभडे यांनी आपले मौलिक विचार आपल्या भाषणातून मांडले.
श्रीमती. सुनिता वाघ यांनी शेवटीं आभार प्रदर्शन केले. अशाप्रकारे संपूर्ण कार्यक्रम अतिशय आखीव, रेखिव व दिमाखदार पार पडला.